**<u>ठळक बातम्या</u>**

- बाल विवाह रोखण्यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी शासन प्रयत्नशील

- राज्याच्या काही भागांमध्ये मान्सूनला सुरुवात झाली असली तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा कृषीमंत्र्यांचा सल्ला

- टीसीएस धर्मांतर प्रकरणासारख्या घटनांचा अभ्यास करुन कायद्यात सुधारणा सुचवण्यासाठी महिला सदस्यांची समिती स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी मोसमी पावसाची दमदार हजेरी

**<><><><><>**

राज्यात बाल विवाहाचं प्रमाण कमी करण्यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी विधी आणि न्याय, तसंच ग्रामविकास विभागाच्या मदतीनं कार्यवाही करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधानसभेत दिली. राजस्थानात बालविवाह रोखण्यासाठी ही पद्धत सुरू आहे. राज्यातलं बालविवाहाचं प्रमाण १० टक्क्यांच्या आत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ज्या जिल्ह्यांमधे हे प्रमाण जास्त आहे तिथं विशेष मोहीम राबवली जात आहे. गेल्या वर्षी राज्यात सुमारे पंधराशे आणि चालू वर्षात आतापर्यंत चौदशेहून अधिक बालविवाह रोखल्याची माहिती त्यांनी दिली. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार २०१९-२१ या कालावधीत देशात बालविवाहाचं प्रमाण २३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि राज्यात सुमारे २२ टक्के होतं. २०२३-२४ मध्ये काही जिल्ह्यात झालेल्या सर्वेक्षणानुसार हे प्रमाण राज्यात १९ पूर्णांक ७ दशांश टक्के झाल्याची माहिती त्यांनी विधानसभेत दिली. परभणी, बीड, धुळे, सोलापूर जिल्ह्यात बाल विवाहाचं प्रमाण ४० टक्क्यापेक्षा जास्त असल्याची माहिती सरकारनं लेखी उत्तरात दिली.

गेल्या आर्थिक वर्षात राज्यात ५ वर्षाखालच्या १२ हजार ७२९ बालकांचा आणि गेल्या ३ वर्षात ४० हजार ५५९ बालकांचा मृत्यू झाला. मुदतपूर्व जन्म, जंतू संसर्ग, न्यूमोनिया वगैरे कारणांमुळे हे मृत्यू झाले आहेत. हे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना सुरू असल्याची माहिती सरकारनं विधानसभेत लेखी उत्तरात दिली. गेल्या ३ वर्षापासून राज्यात कुपोषित बालकांचं प्रमाण कमी होत असल्याची माहितीही सरकारनं दिली.

राज्याच्या काही भागांमध्ये मान्सूनला सुरुवात झाली असली तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला आहे. विधानसभेत एका चर्चेला उत्तर देताना भरणे म्हणाले की, शेतकऱ्यांनी प्रथम आपल्या शेतातली ओलाव्याची पातळी तपासून, पुरेसा ओलावा असल्याची खात्री झाल्यावरच पेरणी करावी. एल निनोसह हवामानातल्या इतर अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभाग मदत करेल, असं आश्वासनही भरणे यांनी दिलं.

बोगस डॉक्टरांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याचं सरकारचं नियोजन असल्याचं आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत दिलं.

दरम्यान, पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शोक प्रस्ताव वाचताना झालेल्या चुकांबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. छापील भाषणाची प्रत अस्पष्ट होती, त्यात काही चुका होत्या त्यामुळे वाचताना चूक झाल्याचं ते म्हणाले. कोणाच्याही भावना दुखावण्याचा उद्देशाने नव्हे तर चुकून हे झाल्याचं त्यांनी मान्य केलं.

तत्पूर्वी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत झालेल्या अनियमिततेच्या निषेधार्थ विरोधी पक्ष सदस्यांनी विधान भवन परिसरात निदर्शनं केली.

<><><><><>

राज्यात सर्व १०० टक्के फीडर्सवर स्मार्ट मीटर्स लावले असून, एकंदर ग्राहकांपैकी फक्त १३ शतांश टक्के लोकांनाच ग्रिड सपोर्ट चार्जेस लावले आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. सतेज पाटील यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. ग्रिड सपोर्ट चार्ज यंदा १ फेब्रुवारीपासून लावला असून पूर्वलक्ष्यी

प्रभावानं लावलेला नसल्याचं फडनवीस यांनी सांगितलं. आजूबाजूच्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात विजेचा दर कमी आहे आणि वर्ष २०२९-३०पर्यंत तो ७ रुपये ४३ पैसे इतका खाली येईल, असं ते म्हणाले.

नाशिकमध्ये TCS कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न आणि धार्मिक भावना दुखावल्याचं प्रकरण, अशा घटनांचा अभ्यास करण्यासाठी, याबाबत सध्या लागू असलेले कायदे आणि नियमांचा अभ्यास करून बदल सुचवण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या महिला सदस्यांची समिती स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेत केली. नाशिक प्रकरणी एकंदर ९ गुन्हे दाखल झाले असून संबंधित ऑपरेशन मॅनेजरवरही गुन्हा दाखल केल्याची माहिती त्यांनी दिली. SITनं या प्रकरणाची चौकशी जवळपास पूर्ण केली असून अंतिम अहवाल लवकरच येईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ६ खासदार पक्षातून बाहेर पडल्याप्रकरणी खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांनी आज लोकसभा सभापती ओम बिरला यांची भेट घेतली. एका पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेले खासदार दुसऱ्या पक्षात जाऊ शकत नाहीत, त्यांची संख्या पक्षाच्या एकूण खासदारांच्या दोन तृतीयांश असली तरीही संविधानातल्या १०व्या अनुसूचीतल्या तरतुदीनुसार हे करता येणार नाही असं आपण सभापती बिरला यांना सांगितलं, अशी माहिती अनिल देसाई यांनी नंतर वार्ताहरांना दिली. या प्रकरणी सभापती संविधान आणि लोकशाहीचा आदर करणारा निर्णय घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसानं राज्याचा बहुतांश भाग व्यापला असून येत्या आठवडाभरात राज्यात सर्वदूर पाऊस होईल असा अंदाज आहे. ऐकूया सविस्तर वृत्त आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - - होल्ड- व्हीसी- कौस्तुभ- - -**

*(मुंबईत कालपासून पावसानं संततधार धरल्यानं तापमान कमी होऊन मुंबईकरांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. शहराच्या सखल भागात पाणी साचल्यानं रस्ता आणि रेल्वे*

*वाहतुकीवर परिणाम झाला. रल्वे रुळांखाली जमीन खचल्यानं ट्रान्सहार्बर सेवा पहाटे काही काळ बंद होती. दुपारनंतर पावसाला उतार पडला आहे.*

*ठाणे शहरात मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी झाडं उन्मळून पडली. सखल भागात पाणी साचून वाहतुकीचा खोळंबा झाला. काही घरांचं नुकसान झालं.*

*पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातही पावसानं जोर धरला असून अनेक ठिकाणी पडझडीच्या घटना झाल्या. अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला. लांजा तालुक्यात आरगाव इथं बांध  कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला. मुंबईसह कोकणातल्या सर्व जिल्ह्यांना हवामानविभागानं ऑरेंज अलर्ट दिला आहे. मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असा इशारा दिला आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर तसंच मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता आहे.)*

<><><><><>

माहिती अधिकार कायद्यातले प्रस्तावित बदलाच्या विरोधात  ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांनी ५ जुलैपासून उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, त्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी आज हजारे यांची भेट घेतली. मात्र ही बैठक निष्फळ ठरली असून आण्णा हजारे यांनी आपण उपोषणावर ठाम असल्याचं म्हटलं आहे.

तर आपण सरकारचा निरोप घेऊन आलो नव्हतो, आंदोलनाबाबत सरकार आणि आण्णा हजारे यांनी निर्णय घ्यायचा आहे, असं आयुक्त राहुल पांडे बातमीदारांशी  बोलताना म्हणाले.

<><><><><>

केंद्रीय विद्यालयांसाठीच्या छत्तिसाव्या राष्ट्रीय युवा सांसद स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ उद्या नवी दिल्लीत होणार आहे. या समारंभात संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल पारितोषिकं प्रदान करतील. ही स्पर्धा देशभरात २५ विभागातल्या २०० शाळांमध्ये आयोजित करण्यात आली होती. युवा सांसद योजनेचा उद्देश तरुण पिढीमध्ये स्वयंशिस्त, मतांतराविषयी सहिष्णुता, योग्य प्रकारे मते मांडणे आणि लोकशाही जीवनशैलीशी संबंधित इतर सद्गुण रुजवणे हा आहे.

पुण्याच्या हवाईदल तळावरच्या पीएमश्री केंद्रीय विद्यालयाचा प्रादेशिक विजेत्यांमधे समावेश आहे.

<><><><><>

पालघर जिल्हा परिषदेनं "पालघर जिल्हा शिक्षण रूपांतरण कार्यक्रमा" अंतर्गत मोतीलाल ओसवाल फाउंडेशनशी बहु-भागीदार सामंजस्य करार केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी आणि युवकांच्या विकासासाठी विविध स्तरांवर काम केलं जाणार आहे.

या कार्यक्रमात लीडरशिप फॉर इक्विटी, लर्निंग लिंक्स फाउंडेशन, क्वेस्ट आणि लाइटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन या संस्थांचा सहभाग असून त्यांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि युवकांना लाभ मिळणार आहे. शिक्षणासोबतच रोजगार आणि व्यक्तिमत्त्व विकासाला ही या उपक्रमातून चालना मिळणार आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी स्पेनच्या जोडीचा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. ट्रिसा आणि गायत्रीने स्पेनच्या पॉला लोपेझ आणि लुसिया रॉड्रिग्ज यांना २१-१२, १४-२१, २१-१३ अशी मात दिली. पुढच्या फेरीत त्यांचा सामना जपानच्या सुमिरे नकाडे आणि मियू ताकाहाशी यांच्याबरोबर होणार आहे. पुरुष एकेरी प्रकारात रौनक चौहान याने मुख्य फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. त्याने सुरुवातीला फ्रान्सच्या एनोगॅट रॉयचा २१-१९, २१-१६ असा पराभव केला आणि त्यानंतर चायनीज तैपेईच्या कुओ कुआन लिनवर १३-२१, २१-१४,२१-१० अशी मात केली.

<><><><><>

राज्याच्या इतर भागात मान्सूनची घोडदौड सुरूच राहील तसंच येत्या आठवड्यात विविध भागात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात आजपासून ३० जूनपर्यंत सर्वदूर पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्रात आज आणि २६ आणि २७ जूनला जोमदार पाऊस पडेल. तसंच मराठवाड्यातही आजपासून २६ जूनपर्यंत चांगला पाऊस पडेल असा अंदाज आहे.

//<><><><><>//